BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-202

# बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये १५ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

वार्ताहर
पाटण

कोयना एज्युकेशन सोसायटी संचालित येथील बाळासाहेब देसाई कॉलेज व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार१५ रोजी येथे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राप्रसंगी कला विभागातून मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा तर सामाजिकशास्त्र विभागामधून अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व भूगोलशास्त्र यांची एकत्रित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'भाषा एवं संस्कृति मराठी, हिंदी आणि इंग्रजी साहित्यातील बदलते स्वरूप' या विषयावर तर सामाजिकशास्त्र विभागाचे 'शाश्वत विकासासाठी साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन' या विषयावर आयोजित चर्चासत्राचे उदघाटन कुलगुरू प्रो. डॉ. डी. के. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.